# युरोप २०१९.

## भाग १ - पूर्वतयारी

युरोप २०१९ बद्दल लिहूया ठरवलं पण हे प्रवासवर्णन म्हणजे फक्त पाहिलेल्या ठिकाणांचं वर्णन नाही. ह्यातली सगळीच ठिकाणं बहुतेकांनी पाहिलेली असणार आहेत. पण तिथपर्यंतचा माझा प्रवास हा मात्र सगळ्यासारखा असणार नव्हता, तसा तो नसतोच कोणाचा !! खरंतर त्यामुळेच ते लिहावंसं वाटतं, सांगावंसं वाटतं.

जुलै २०१९ मध्ये युरोपला जाण्यासाठी १० महिने आधीपासून ठरवत होतो !! टूर्स बरोबर जाणं एकुणातच जमणार नव्हतं तरी उत्सुकता म्हणून त्यांची ठिकाणं आणि भरण्याची एकूण रक्कम काढत होतो. दरवेळी प्रमाणे ह्यावेळी पण ‘विनायक टूर्स’चा म्हणजे स्वतंत्र यात्रा कंपनीचा झेंडा फडकावला. हवे तसे आणि हवे तिथे शक्य असेल तितके दिवस राहायचे. सगळे बघायचेच असा अट्टाहास नव्हता. शहर हिंडायचे ते तिथल्या पब्लिक ट्रान्सपोर्टने किंवा पायी हे नेहमीप्रमाणे ठरवलेले! या आधी दुबई आणि श्रीलंका याच पद्धतीने केलेल्या; पण युरोपची बात वेगळीच होती हे तयारीला लागल्यालागल्या समजलेच. सर्वात आधी डोक्यातून जर्मनी, फ्रान्स आणि ऑस्ट्रिया काढून टाकले. लंडनही यादीत नव्हतेच. कारण १०/१२ दिवसात एवढे करणे शक्य झाले नसते. पण मग अतुल-प्राचीच्या आग्रहाखातर लंडन घ्यावेच लागले. सुरु झाली तयारी व्हिसाची. फॉर्म्स भरून अपॉइंटमेंट घेण्याचे काम मेच्या शेवटच्या आठवड्यात करायचे ठरले. बहुतेकांनी आधी सांगितले ‘अरे, होते १५ दिवसात काम. काळजी नको.’ त्याआधी म्हणजे ७/८ महिने लंडन, स्वित्झर्लंड आणि इटली मध्ये कुठे जायचे आणि कुठे राहायचे याचा शोध चालू झाला. त्याशिवाय किती दिवस राहायचे हे ही ठरवणे भागच होते. त्या दृष्टीने airbnb ची साईट पिंजून काढली. विनायकने लंडन, स्वित्झर्लंड मध्ये २ गावात, व्हेनिस आणि रोम अशा ५ ठिकाणी योग्य वाटतील अशा जागी अपार्टमेंट्स

बुक केली. हे  काम  फारच किचकट आणि वेळखाऊ होते. प्रत्येक ठिकाणापासूनचे ट्रेन-स्टेशन, आजूबाजूचा परिसर, तिथे असलेल्या सोयी, आजूबाजूचे सुपरमार्केट हे तर बघितलेच पण त्याशिवाय त्या मालकाचे मानांकन, लोकांनी त्याच्या विषयी लिहिलेली मते आणि अनुभव ह्या  सर्वांचा अभ्यास करून चाळणीतून उरतील त्या अपार्टमेंट्सवर शिक्का-मोर्तब करून पैसे  भरले. फेब्रुवारी/मार्च मध्ये हे झाले असे वाटले तेवढ्यातच लंडन येथील मालकाचा मेल आला कि त्याचे airbnb चे रेजिस्ट्रेशन रद्द झाल्याकारणाने पैसे परत करत आहे. पुन्हा लंडनसाठी जागेचा शोध घेतला आणि थोडं लांब पण चांगली connectivity असेल अशा ठिकाणी नवीन अपार्टमेंट बुक केलं. पुढचे २/३ महिने तिकडे काय बघायचे, किती वेळ लागेल, ट्रान्सपोर्ट काय असेल ह्यावर संशोधन करण्यात गेला. काय बघायचे आणि कधी ह्याचे एक अंदाजे कल्पनाचित्र तयार केले, अर्थातच गूगल मॅप वरून. ज्यात कधी कुठे आणि कसे जायचे ह्या माहितीबरोबरच किती वेळ लागेल, बस, ट्रेन काय सोयीचे असेल शिवाय ते ठिकाणं बघायला अंदाजे किती वेळ लागेल ह्याचा सर्व तपशील त्यात लिहून ठेवू लागलो. त्याशिवाय तिथे आसपास असणारी भारतीय restaruants ही पाहून ठेवली. त्यातच अंदाजे किती खर्च येईल ह्याचा ही आकडा पुढे टाकून ठेवला. मे महिने उजाडला तसे व्हिसाचे पेपर्स तयार करू लागलो. अपॉइंटमेंट मिळाली त्या दिवशी त्या सर्व पोथ्यांची पारायणं करून पूर्ण तयारीनिशी गेलो. अर्थातच पेपर्स योग्य असल्याने जास्त वेळ न जाता लंडनच्या व्हिसाचे काम झाले. १५ दिवसांनी व्हिसाचा मेसेज आला तशी माझी schengen व्हिसा ची तयारी चालू झाली. विनायकचा schengen  व्हिसा असल्याने इकडे आता मलाच धावाधाव करायची होती. आता एव्हाना १२ जून उजाडला होता आणि मला उगाचच भीती वाटू लागली कि व्हिसा वेळेवर आला नाही तर काय करायचे? बाकी सगळयांचे व्हिसा आले होते. त्यातच एकानी संगितले कि, 'अहो इतक्या शेवटी का केलात, व्हिसा नाही मिळत वेळेवर'. विनायकचा दोन वर्षांपूर्वीचा अनुभव आठवला. त्याचा व्हिसा न आल्याने त्याची ऑफिस ची टूर त्याला रद्द करावी

लागली होती. आता बाकीचे मला चिडवू लागले की तू फक्त लंडनला ये आणि तिथून परत, आम्ही पुढे जाऊ. मी तर हळूहळू मनाची तशी देखील तयारी करू लागले. पण तसे मुळीच व्हायचे नव्हते, ‘चंद्र’ 'माझा प्रवासी ग्रह' माझ्यावर नेहमीसारखाच खुश असणार होता. माझा व्हिसा ४ दिवसातच आला आणि माझ्या तयारीला जोर आला. हळूहळू तिकडे बघण्याच्या गोष्टींचे ऑनलाइन तिकीट काढणे चालू केले. जे नक्की बघायचे ते आणि ज्या पासचा सगळीकडे उपयोग होईल असा स्विस पास काढून झाला. गूगलभाऊंनी खूप मदत केली. आधी गेलेल्या लोकांची मत, अनुभव वाचून त्यातून जे आम्हाला योग्य असेल असे ठरवून बुकिंग केले. त्यात लंडन एअरपोर्टवरून टॅक्सी बुक केली आणि थोडे निवांत झालो की तिकडे पोचल्यापोचल्या टॅक्सी ने घरी पोचू लवकर म्हणून. पण आपण ठरवायचे एक आणि व्हायचे असते दुसरेच !! हा अनुभव परत परत येणारच, नाही का?

तिकडे airbnb मध्ये स्वैयंपाकाची सर्व अत्याधुनिक उपकरणं असणार होती. डिश वॉशर, फ्रिज, ओव्हन, हॉट प्लेट्, क्रोकेरी, त्याशिवाय इस्त्री, वॉशिंग मशीन त्यामुळे ते लक्षात घेऊन खाण्याचे सामान बरोबर घेतले. इन्स्टंट पोहे, उपमा, डाळ फ्राय, जीरा राईस, पुलाव, मूग डाळ खिचडी, अगदी कांदे, मिरच्या, कोथिंबीर, लिंबूही घेतले होते थोडे. त्याबरोबर कोरडा खाऊ - चिवडा, बिस्किट्स असेही होतेच. तेव्हाही हसू येत होत वाटलं, एअरपोर्टवर कोणी बॅग उघडून बघितली तर वाटेल फिरायला चाललेत का जेवायला ? ह्या सगळ्याचं वजन हा वेगळाच प्रश्न सोडवायचा होता. खरंतर तिकडचे खाणे हे पोटासाठी आणि खिशासाठी माफकच ठेवायचे ठरवले होते. मी शाकाहारी, अंडे पण जेमतेम, वास न येता आणि घास पटकन खाता येईल असेच, त्यामुळे माझी अडचण सर्वात जास्त होती. कपडे - थंडीचे, गर्मीसाठी तलम तर पावसासाठी छत्री (जी उन्हासाठीच वापरली जास्त!) असे सर्व सामान माणिक-चौकात येऊ लागले. जे आठवेल ते यादीत लिहून ठेवू लागलो. कॅप्स, गॉगल्स, स्टोल्स, बूट्स, चपला, कंगवे, ब्रश,

पावडर, तेल हे सगळे नेहमीच्या प्रवासाच्या यादीतले तयार होतेच. वजन अंदाजेच बघितले. पण एव्हाना  प्रवासामुळे अंदाज पक्के होऊ लागले होते.

बॅगा भरण्याचा सोहळा २ दिवस चालला. इकडचे तिकडे आणि तिकडचे इकडे होत होते. शेवटी मनासारखे जमले सारे. बऱ्याच गोष्टींची उजळणी केली. बरोबर घ्यायचे पेपर्स, तिकिट्स, पासपोर्ट्स, करन्सी, क्रेडिट-कार्ड्स सर्व तपासून घेतले. इतक्या दिवसांच्या तयारीचा ताण हलका झाला.

आम्ही पहाटेची उबेर बुक करून झोपायचा प्रयत्न करू लागलो. अबुधाबीला जाणारं विमान सकाळी ९.१५ ला होत. त्यासाठी दीर आणि जाऊ आदल्यादिवशी पुण्याहून इकडेच राहायला आले. आता प्रवासाची तयारी संपली होती.

सकाळी जाग येण्यासाठी गजराची आवश्यकता नव्हती हे उठताना समजलंच होत. उगाच गडबड नको म्हणून ५.३० ला निघायचं होत तरी ५.१५ ची उबेर बुक करून ठेवली होती. ५ वाजायला ५ मिनिटे असतानाच माझा फोन वाजला आणि मी आश्चर्याने उचलला. उबेरच्या चालकाने कुठे यायचं विचारलं. मी सांगितल्यावर म्हणाला, मी पोचतो २ मिनिटात. आम्ही सगळेच चक्रावलो. कारण अजून १५/२० मिनिटे आहेत असा गृहीत धरून आमचं आवरणं चाललेलं होत. शिवाय आजपर्यंतचा उबेरचा किंवा तत्सम टॅक्सीचा अनुभव असा सांगत होता की 'लक्ष ठेवा, चालक जवळ आल्याचा दिसत असला तरी कधीही कॅन्सल करू शकतो.'   त्यामुळे एक अदृश्य ताण सगळ्यांच्या मनावर होताच. हे काही विपरीतच घडत होत. त्याला म्हटलं, 'थांब,  बाबा १०/१५ मिनिटे, आलोच आम्ही.' तर लेकाने ठोकून सांगितलं कि, ‘५ मिनिटापेक्षा जास्त थांबणार नाही. आम्हाला परवानगी नाही.’ मी हातातला आवरायचं सोडून या अनपेक्षित उत्तराने गोंधळून गेले. त्या भल्या पहाटे त्या भल्या गृहस्थाने मला टॅक्सीचे  नियम समजावून सांगायला सुरवात केली. त्याचे २ मिनिटे ऐकल्यावर मी त्याला आजवर

अनुभवलेली वस्तुस्थिती सांगू लागले. पण जेव्हा तो ऐकत नाही असे वाटले तेव्हा त्याला म्हटले की 'अजून मला सांगत राहिलास तर अजून उशीर होईल आणि तुला तेवढं थांबावं लागेल, मी काही आता दुसरी टॅक्सी, तीदेखील मोठी टॅक्सी बुक करू शकत नाही, करणारही नाही.' गरज माझी होती तरी माझाच आवाज चढला होता. मला त्यांच्या नियमांची तार्किकता मुळीच पटत नव्हती. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे नियम आमच्यासाठी होते का? आणि असतील तर ते आम्हालाच माहित नाही, असे का?

जगाच्या ह्या अवाढव्य पसाऱ्यात तुम्ही कोण? ह्या अनुभवासाठी आजूबाजूची माणसंच पुरेशी असतात, नाही का? निसर्गाकडे जाऊन शिकायची ही गोष्ट इथे तुमच्याकडे येऊनच शिकवली जाते. याचे अध्यात्मिक आणि प्रापंचिक अन्वयार्थ लावत मी शांत झाले.

घर घाईतच बंद करावे लागले. पुढच्या १५ मिनिटात आम्ही सामानासकट टॅक्सीत जाऊन बसलो. टॅक्सीवाल्याचा भलेपणा गौरवत मार्गस्थ झालो!. नवा दिवस नवे अनुभव घेऊन आमची वाट पाहत होता.




-------------**संध्या रानडे.**